नि. फौ. ख. क्र.७५/२०२०
सरकार विरुध्द मिर्झा जावीद बेग
निशाणी क्र. ४५

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६**

मी शपथेवर निवेदन करतो की,

माझे नावः **अजहर अली मजहर अली,**
वयः**३३ वर्षे,** व्यवसायः **मिस्त्रीकाम**
राहणारः **सिरजखोड ता.धर्माबाद जि.नांदेड.**

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जाधव यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

पोलीसांनी मला जप्ती पंचनामा करण्यासाठी सय्यद दादु यांच्या घरी बोलावले होते. त्यावेळी त्यांनी माझ्यासमक्ष सय्यद दादु याच्याकडुन रक्ताचे डाग लागलेले एक टॉवेल, पांढरा रुमाल, बनियन, पांढरा शर्ट आणि राखाडी रंगाचा पॅन्ट जप्त केला. तो पंचनामा दिनांक २४/०७/२०२० रोजी सायंकाळी ०५.०० ते ०६.०० च्या दरम्यान करण्यात आला. ते कपडे मला दाखवल्यास ओळखु शकतो. त्यावेळी माझयासोबत सय्यद इम्रानअली आसीफअली हा दुसरा पंच हजर होता. आता साक्षीदाराला अभिलेखावरील जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. **मुळ जप्ती पंचनान्यास निशाणी क्र.४६** देण्यात येत आहे. आता साक्षीदाराला गुन्हयातील जप्त कपडे दाखवण्यात आले. ते तेच आहेत. एक **पिवळ्या रंगाचा टॉवेल या वस्तु निशाणी ४७, पांढरा रुमालाला वस्तु निशाणी ४८, बनियनला वस्तु निशाणी ४९, पांढरा शर्टला वस्तु निशाणी ५० आणि राखाडी रंगाचा पॅन्टला वस्तु निशाणी ५१** देण्यात येत आहे.

**सर्व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस.एच.काझी यांच्यामार्फत शपथेवर उलटतपास सुरु.**

०२. हे खरे आहे की, मी फिर्यादीचा नातेवाईक आहे. पंचनाम्याच्या वेळी जप्त केलेले कपडे फिर्यादीने घातलेले नव्हते, त्याने ते काढुन आणुन दिले. त्यावेळी कपडे रक्ताने ओले नव्हते. फिर्यादीने ते कपडे कोठुन काढुन आणले, हे मी सांगु शकत नाही. हे भांडण माझ्यासमक्ष झालेले नाही. त्या कपडयावर भांडणाच्या वेळी लागलेले रक्ताचे डाग आहेत. हे खरे नाही की, मी सरतपासात माझ्या समक्ष कपडे जप्त करुन पंचनामा केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, सदरचा पंचनामा हा पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आला.

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/-

**(एस.ए.हरणे)**

**दिनांक: २९.०८.२०२४** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.**